आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)

दिनांक 1 ऑक्टोबर 2025

ठळक बातम्या

- केंद्रीय कर्मचाऱ्यांना ३ टक्के महागाई भत्ता आणि दिवाळी बोनस घोषित
- राज्यातील पूरपरिस्थितीमुळे १० टक्के एसटी भाडेवाढीचा निर्णय रद्द करण्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश
- नागपूर ते चंद्रपूर या २०४ किलोमीटर लांबीच्या चार पदरी सिमेंट काँक्रीट महामार्गाला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता
- धम्मचक्र प्रवर्तन दिन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी कार्यक्रम, दसरा आणि रावण दहन यांसह विविध सोहळ्यांसाठी नागपूर सज्ज

-----------------------------------------------------

मंत्रिमंडळ निर्णय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या, केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज, केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना, तीन टक्के महागाई भत्ता अर्थात डी.ए. आणि निवृत्तीवेतन धारकांना महागाई मदत अर्थात डी.आर.चा अतिरिक्त हप्ता, देण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

ही रक्कम यावर्षीच्या एक जुलैपासून, देण्यात येईल. याचा लाभ सुमारे ४९ लाख केंद्रीय कर्मचारी आणि, ६८ लाख निवृत्तीवेतन धारकांना होईल. दिवाळी बोनस देखील केंद्रीय कर्मचाऱ्यांना देण्यात येईल.

अन्य महत्वपूर्ण  निर्णयांमध्ये, २०२६-२७च्या विपणन हंगामासाठी, रब्बी पिकांसाठी किमान आधारभूत किमतीला, मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे.

याशिवाय देशभरात नागरी क्षेत्रांतर्गत, ५,८६२ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चासह, ५७ नवीन केंद्रीय विद्यालयं उघडण्यास देखील, मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे.

---------------------------------------------------

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मोदी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा, शंभर वर्षांचा गौरवशाली प्रवास हा, त्याग, निःस्वार्थ सेवा, राष्ट्रनिर्माण आणि शिस्त यांचं, अनोखं उदाहरण आहे असं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं.

नवी दिल्ली इथं आयोजित, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी समारंभात, आज ते बोलत होते. त्यांनी स्वयंसेवकांना शुभेच्छा दिल्या आणि संघ संस्थापक, डॉ.हेडगेवार यांना, श्रद्धांजली अर्पण केली.

*(संघ के अलग-अलग संगठन भी जीवन के हर पक्ष से जुड़कर राष्ट्र की सेवा करते हैं शिक्षा हो कृषि हो समाज कल्याण हो आदिवासी कल्याण हो महिला सशक्तिकरण हो कल और विज्ञान का क्षेत्र हो समाज जीवन के ऐसे कई क्षेत्रों में संघ निरंतर कार्य कर रहा है एक धारा अनेक धारा तो बनी लेकिन लेकिन उसमें कभी विरोध भास पैदा नहीं हुआ जो क्योंकि संगठन का उद्देश्य एक ही है राष्ट्र प्रथम, नेशन फर्स्ट)*

पंतप्रधानांच्या हस्ते यावेळी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या, देशाप्रती असलेल्या योगदानाबद्दल, विशेष टपाल तिकीट आणि नाण्याचं अनावरण करण्यात आलं.

---------------------------------------------------

संघ शताब्दी कार्यक्रम

उद्या विजयादशमीच्या दिवशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपली शताब्दी साजरी करत आहे. या प्रसंगी आयोजित विशेष कार्यक्रमासाठी माजी राष्ट्रपती डॉ.रामनाथ कोविंद उपस्थित राहणार आहेत. यावेळी सरसंघचालकांच उद्बोधन होणार असून हा सोहळा बघण्यासाठी देश विदेशातील तसच गणमान्य अतिथींना आमंत्रित करण्यात आलं आहे. तत्पूर्वी आज रामनाथ कोविंद यांनी दीक्षाभूमी येथील डॉ . बाबासाहेब आंबेडकरांच्या मध्यवर्ती स्मारकाला अभिवादन केलं .

---------------------------------------------------

## भाडे दरवाढ रद्द

राज्यातील पूर परिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने केलेली १० टक्के बस भाडे दरवाढ रद्द करण्याचे निर्देश परिवहन मंत्री यांना दिल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मुंबईत ते माध्यमांशी बोलत होते. एस टी महामंडळ दरवर्षी दिवाळीच्या काळात दहा टक्के भाडेवाढ करीत असते. यातून महामंडळाला ३० कोटी रुपयांचा महसूल मिळतो. मात्र यंदा राज्यात निर्माण झालेली पूरपरिस्थिती लक्षात घेवून अपवाद म्हणून महामंडळाने जाहीर केलेली १० टक्के भाडेवाढ रद्द करण्याचे निर्देश दिल्याचं त्यांनी सांगितलं.

---------------------------------------------------

## 'सेवा पर्व'

'सेवा पर्व' या विशेष मालिकेच्या आजच्या भागात, जी-टवेन्टी शिखर परिषदेच्या माध्यमातून भारतानं साऊथ ग्लोबलचा बुलंद केलेला आवाज आणि जागतिक पातळीवर उदयास येणारं भारताचं नेतृत्व याविषयी जाणून घेऊ...

*“पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, भारत एक प्रबळ जागतिक नेतृत्व म्हणून उदयास आला आहे. २०२३ मध्ये भारताच्या जी-टवेन्टी परिषदेच्या अध्यक्षपदामुळे ग्लोबल साऊथ या संकल्पनेचा उदय झाला. आफ्रिकन युनियनचे सदस्यत्व आणि जागतिक जैवइंधन आघाडीची सुरुवात यांचा यात समावेश आहे.*

*ग्लोबल साऊथला आवाज मिळवून देण्याव्यतिरिक्त, भारतानं जी-ट्वेन्टी परिषदेचा अध्यक्ष या नात्यानं देशभरात बैठका घेऊन आपला सांस्कृतिक वारसा जगासमोर प्रदर्शित केला.*

---------------------------------------------------

मुख्यमंत्री/द्रुतगती मार्ग-

नागपूर ते चंद्रपूर या २०४ किलोमीटर लांबी असलेल्या चार पदरी सिमेंट काँक्रीट महामार्गाला आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच चंद्रपूर ते मुल दरम्यान महामार्ग निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिल्या. भविष्यामध्ये कुठलाही रस्ता बांधताना रस्त्याच्या परिसरात विकासाची परिसंस्था निर्माण करण्यात यावी आणि त्यासाठी आधीपासूनच भूसंपादन करून नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. नागपूर ते चंद्रपूर महामार्ग, नवेगाव मोरेपर्यंत करण्यात येत असल्याने पुढे सुरजागड लोह प्रकल्पापर्यंत या महामार्गाची लांबी वाढवण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

---------------------------------------------------

धम्मचक्र प्रवर्तन

नागपूरच्या दीक्षाभूमीत एकोणसत्तराव्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त उद्या मुख्य सोहळा होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी नागपूरचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या हस्ते आज दीक्षाभूमी परिसरातील मुख्य सोहळ्याच्या ठिकाणी पंचशील ध्वजारोहण करण्यात आलं. उद्याच्या कार्यक्रमासाठी लाखो अनुयायी नागपुरात दाखल होत असून त्यांच्या सोयीकरिता नागपूर महानगरपालिका, जिल्हा प्रशासन, मध्य रेल्वे तसंच नागपूर मेट्रो रेल्वेने देखील सुविधा सुनिश्चित केल्या आहेत.

---------------------------------------------------

व्हाईस कास्ट - हेमांगी

*धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त, नागपूर इथं दाखल होणाऱ्या लाखो अनुयायांच्या गर्दीचा विचार करून, मध्यरेल्वे तर्फे, विशेष गाड्यांचं नियोजन करण्यात आलं आहे.*

*नागपूरहून मुंबई, C.S.M.T., पुणे, सोलापूर, नाशिक रोड, भुसावळ, अकोला, नांदेड आणि बिदर या मार्गांवर, या गाड्या धावणार आहेत. एक ते चार ऑक्टोबर दरम्यान विविध वेळेत गाड्या सोडण्यात येणार असून, अजनी, वर्धा, बडनेरा, अकोला, भुसावळ, मनमाड, दौंड, चंद्रपूर, बल्लारपूर, नांदेड आदी ठिकाणी, थांबे दिले आहेत.*

*या विशेष गाड्यांमुळे, भाविकांचा प्रवास सुलभ आणि सोयीस्कर होणार आहे. त्याच प्रमाणे, विजयादशमी आणि धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त, नागपूर मेट्रोसेवेत विशेष वाढ करण्यात आली आहे.*

*उद्या दोन ऑक्टोबर रोजी, मेट्रोसेवा सकाळी पाच वाजता पासून रात्री बारावाजेपर्यंत, उपलब्ध राहील. याशिवाय, राजपत्रित सुट्टीच्या दिवशी, प्रवाशांना मेट्रो प्रवासावर, तीस टक्के सवलतही मिळणार आहे.*

*नागपुरात दाखल होणाऱ्या, अनुयायांच्या स्वागतासाठी, प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थाद्वारा, रस्त्यावर ठिकठिकाणी भोजनदान, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, निवाऱ्यासाठी मंडप आदी व्यवस्था करण्यात आली आहे.*

*उद्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त, सकाळी नऊवाजता सामाजिक न्यायभवन इथं, 'भिमवादळ' या ढोल-ताशा पथकाच्या माध्यमातून, बाबासाहेबांना मानवंदना देण्यात येणार आहे. त्यानंतर सामाजिक न्याय भवन ते दीक्षाभूमीपर्यंत, समता रॅली काढण्यात येणार असून, रॅलीनंतर दीक्षाभूमी येथील बार्टीच्या पुस्तक स्टॉलचं, उद्धाटन करण्यात येणार आहे.*

*स्टॉल क्रमांक जी-261, 262, 263 वर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेली ग्रंथसंपदा तसंच, बाबासाहेबांच्या विचारांवर आधारित, संवैधानिक मुल्यांचा जागर करणारे ग्रंथ, विक्रीसाठी ठेवण्यात येणार आहेत.दुपारी सामाजिक न्याय भवन इथं प्रसिध्द गायक विष्णु शिंदे आणि विकास राजा यांचा शाहिरी जलसा आयोजिण्यात आला आहे आकाशवाणी वृत्त विभागातून मी हेमांगी*

---

चंद्रशेखर बावनकुळे

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक महायुती सोबत लढेल असा विश्वास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. ते आज नागपुरात विविध विषयांवर माध्यमांशी संवाद साधत होते -

महायुती ही महानगरपालिका जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका निवडणूक निवडणुकीमध्ये एकत्र लढणार आहे. काही ठिकाणी आम्ही चर्चा करून, ज्या ठिकाणी आम्हाला अडचण वाटते त्या ठिकाणी मैत्रीपूण लढू, महायुतीमध्ये कुठल्याही परिस्थितीमध्ये मतभेद होणार नाही आणि आमची युती 51% मत घेऊन महाराष्ट्रात येईल)

---

## राज्यस्तरीय मुष्टियुद्ध स्पर्धा

अलिबागच्या नेहुली इथं झालेल्या शालेय राज्यस्तरीय मुष्टियुद्ध स्पर्धेत अकोला क्रीडा प्रबोधिनी आणि जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रांच्या खेळाडूंनी तब्बल १८ पदकांची कमाई केली. यात ८ सुवर्ण, २ रौप्य आणि ८ कांस्यपदकांचा समावेश असून शाश्वत महल्ले सुवर्ण पदक पटकावून सर्वोत्कृष्ट मुष्टियोद्धा ठरला.

---

## जंगल सफारी

निसर्गसंपन्न भंडारा जिल्ह्यातील कोका वन्यजीव अभयारण्यात आजपासून जंगल सफारी आणि निसर्गभ्रमंतीला सुरुवात झाली. सकाळी ६.३० ते १०.३० आणि दुपारी ३ ते ६ या वेळेत सफारी खुली राहणार असून या हंगामामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

---

## मुक्त विद्यापीठ

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांना प्रवेशासाठी दिनांक १० ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी या मुक्त विद्यापीठाच्या १२ विद्याशाखांच्या १३८ वेगवेगळया प्रकारच्या पदवी, पदव्युत्तर, पदविका आणि प्रमाणपत्र शिक्षणक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन सुरू आहे.

---